**नि.५६ वरील आदेश**

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश २६, नियम ९ नुसार दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी उपअधिक्षक भुमी अभिलेख, सावंतवाडी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादींच्या कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा कायम ताकीदीकरीता दाखल केला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमधून अनाधिकारे रस्त्यासाठी जमिनीचे सपाटीकरण करु नये इत्यादी मागण्या केल्या आहेत व नि. ५ च्या अर्जामध्ये दावा मिळकतीमधून प्रतिवादीने रस्ता काढू नये अशी मागणी केली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. २२ व १८ वर म्हणणे दाखल करुन ''दावा जमिनीमधून जाणारा रस्ता हा शेर्लेहून कास गावाकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याला जाऊन मिळतो. तसेच सदरचा रस्ता हा सर्वे नंबर ७१ हि. नं.१अ मधून भाईपवाडी निसापासून गोडेरान स्मशानापर्यंत रस्ता जातो. त्या रस्त्याची लांबी ५०० मीटर असून रुंदी ३ मीटर आहे'' असे नमुद केले आहे. प्रतिवादीने नि.२२ मध्ये नमुद केलेले वस्तुस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदर अर्ज दाखल करुन उपअधिक्षक भुमी अभिलेख, सावंतवाडी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात यावी व गांव मौजे कास, ता. सावंतवाडी येथील स. नं. ७१, हि. नं. १अ या दावा विषयक मिळकतीत जावून

त्याठिकाणी प्रतिवादीने नि.२२ मध्ये नमुद केलेला रस्ता जाग्यावर आहे किंवा नाही, असल्यास तो कोठून कुठेपर्यंत जातो, त्याची लांबी, रुंदी किती आहे यासंबंधी सविस्तर अहवाल नकाशा वजा स्केचसह काढुन सादर करण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

३) वादी यांनी नि. ५७ वर आपले म्हणणे सादर करुन अर्जास विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत अर्ज खोटा, लबाडीचा व न्यायालयाची दिशाभुल करण्यासाठी दाखल केला आहे. नि.५ चा अर्ज अंतिम आदेशासाठी प्रलंबित असताना त्यास विलंब व्हावा व दावा मिळकतीमधून रस्त्याचे काम सुरु करता यावे यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीने दाव्यासोबत नि. ४/२ येथे दावा मिळकतीचा उपअधिक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी काढलेला मुळ नकाशा दाखल केला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता प्रतिवादी नि. ५६ च्या अर्जात नमुद करतात त्याप्रमाणे उपअधिक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी यांनी सुमारे ५०० मीटर लांब व ३ मीटर रुंद रस्ता नकाशात दर्शविणे बंधनकारक होत. मात्र असा कोणताही रस्ता अस्तित्वात नसल्याने त्यांनी नकाशात रस्ता दाखविला नाही.

४) तसेच दाव्यासोबत नि. ४/७ कडे हजर केलेल्या फोटोंचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यामार्फत दावा मिळकतीमध्ये सपाटीकरण करण्यात येत असल्याचे स्पष्ट होते. दावा मिळकतीमधून प्रतिवादी बेकायदेशीर रस्ता काढत असून त्यावर शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च होणार आहे. असा निधी खर्च

करण्यापुर्वी सदरचा रस्ता ज्या जमिनीमधुन जातो तो रस्ता ग्रामपंचायतीच्या मालकीचा असणे बंधनकारक आहे. परंतु प्रतिवादी यांनी जमिन हस्तांतरीत केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. प्रतिवादी यांनी पुरावा गोळा करण्यासाठी सदरचा अर्ज सादर केला आहे. तरी अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

५) अभिलेखाचे अवलोकन केले व वादीचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे प्रस्तुत अर्जावर अद्याप युक्तीवाद करण्यात आला नाही. प्रस्तुत अर्ज सन २०२२ पासून प्रलंबित आहे. दावा पुढे चालविणेकरीता सदर अर्जावर आदेश होणे जरुरी आहे. सबब प्रतिवादी यांचा युक्तीवाद न ऐकता अर्ज पुढे चालविण्यात येत आहे.

६) प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या कथनानुसार, ''दावा जमिनीमधून जाणारा रस्ता हा शेर्लेहून कास गावाकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याला जाऊन मिळतो. तसेच सदरचा रस्ता हा सर्वे नंबर ७१ हि. नं.१अ मधून भाईपवाडी निसापासून गोडेरान स्मशानापर्यंत रस्ता जातो. त्या रस्त्याची लांबी ५०० मीटर असून रुंदी ३ मीटर आहे.'' सदर रस्ताची वस्तुस्थिती अभिलेखावर येण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल करुन कोर्ट कमिशन नेमण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी कथन करत असलेला रस्ता अस्तित्वात आहे की नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादीची आहे. त्याकरीता प्रतिवादीने कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा देणे आवश्यक आहे. वादीने दाव्यात प्रतिवादी त्याच्या जागेत अतिक्रमण करुन सपाटीकरण करुन नव्याने रस्ता

तयार करत असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत खटला सन २०२२ मध्ये दाखल आहे. प्रतिवादीने रस्त्याचे काही फोटोग्राफ देखील अभिलेखावर दाखल केले आहेत. त्यावरुन सद्य परिस्थितीत रस्ता आहे हे दिसून येते. परंतु सदर रस्ता अनाधिकृतपणे अतिक्रमण करुन तयार केला आहे किंवा कसे ही बाब दोन्ही पक्षांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन शाबीत होईल. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी कोर्ट कमिशनची मागणी करुन पुरावा गोळा करीत असल्याचे दिसून येते. सबब प्रतिवादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

JAHEDA MOHMED MISTRY Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY Date: 2026.01.08 17:18:17 +0530

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी

ठिकाण : सावंतवाडी
दिनांक ०८/०१/२०२६